# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


तंशिप्र १२२४ /प्र.क्र ०६/एमएचटी सीईटी /**Edit Facility**/२०२४/४२४ दिनांक : १८/०३/२०२३

# जाहिर सूचना

**एमएचटी सीईटी २०२४ या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता नोंदणी केलेल्या उमेदवारांना अर्जामध्ये सुधारणा करण्याची सुविधा (Edit Facility) ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबत...**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तंत्रशिक्षण व कृषीशिक्षण विभागांतर्गत असलेल्या **एमएचटी सीईटी २०२४** या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता ज्या उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया परीक्षा शुल्क अदा करुन पुर्ण केलेली आहे. त्यापैकी काही उमेदवारांकडून अर्ज भरताना अनावधनाने विविध प्रकारच्या चुका झालेल्या असून त्या दुरुस्त करण्याबाबत या कार्यालयाकडे लॉगीनमधून, दुरध्वनी, ईमेलद्वारे व प्रत्यक्ष कार्यालयात भेट देऊन विनंती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर उमेदवारांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जात खालील नमूद माहिती मध्ये बदल करण्याबाबत संधी देण्यात येत आहे.

- उमेदवाराचे नाव
- जन्मतारीख
- छायाचित्र
- सही
- लिंग
- ग्रुप बदल करणे.
- ग्रुप समावेश करणे (अतिरीक्त विलंब शुल्कासहीत)

उपरोक्त बदल करण्याचा कालावधी **दिनांक २०/०३/२०२४ ते २२/०३/२०२४** असून या कालावधीमध्ये उमेदवारांनी स्वत:च्या लॉगीनमधून अर्जामध्ये सुधारणा करावी.

सही/-

**आयुक्त तथा सक्षम प्राधिकरी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**